**L. C. BILL No. XVII OF 2026.**

A BILL
TO AMEND THE BHARATIYA NAGARIK SURAKSHA SANHITA, 2023, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७.**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०२३ चा ४६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः—

**१.** या अधिनियमास, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**२.** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त संहिता" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १५ मधील, "पोलीस अधीक्षक" या मजकुराऐवजी, "सहायक पोलीस आयुक्त किंवा उप विभागीय पोलीस अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२३ चा ४६.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ९८ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ९८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ख) मधील, "दृश्य प्रतिरूपण" या मजकुरानंतर, "किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल अभिलेख" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १०७ ची सुधारणा.

**४.** उक्त संहितेच्या कलम १०७ मध्ये, पोट-कलम (१) मधील " पोलीस आयुक्ताच्या" या मजकुरानंतर, "किंवा सह पोलीस आयुक्ताच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १२९ ची सुधारणा.

**५.** उक्त संहितेच्या कलम १२९ मध्ये , खंड (च) मधील, उप-खंड (एक) मधील,—

(१) परिच्छेद (छ) मधील, "किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल;

(२) परिच्छेद (छ) नंतर, पुढील परिच्छेद जादा दाखल करण्यात येईल :—

"(ज) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५; किंवा". १९८५ चा ६१.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १७० ची सुधारणा.

**६.** उक्त संहितेच्या कलम १७० मध्ये,—

(१) पोट-कलम (२) मधील, "जर तिची" या मजकुरानंतर, "पोट-कलम (३) अन्वये किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः-

"(३) (क) जेव्हा एखाद्या व्यक्तीला या कलमाखाली अटक केली असेल आणि अटक करणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा ज्याच्यासमोर अटक केलेल्या व्यक्तीला हजर केले असेल त्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास,-

(एक) ती व्यक्ती, तिची सुटका केल्यानंतर, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला दखलपात्र अपराध, करण्याचा बेत रचण्याचे चालू ठेवण्याचा संभव आहे किंवा तो अपराध करण्याचा संभव आहे; आणि.

(दोन) प्रकरणाची परिस्थिती अशी असेल की, ती मोकळी राहणे हे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरण्याचा संभव आहे,

या कारणावरून अटक केलेल्या व्यक्तीची स्थानबद्धता, अटकेच्या वेळेपासून (अटक केलेल्या व्यक्तीला अटकेच्या ठिकाणापासून न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात नेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळून) चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी आवश्यक आहे असे समजण्यास वाजवी कारण असेल त्या बाबतीत, अटक करणारा अधिकारी, किंवा पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, अशा अटक केलेल्या व्यक्तीची स्थानबद्धता, चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी चालू ठेवण्याची कारणे नमूद करणाऱ्या लेखी अहवालासह, अटक केलेल्या व्यक्तीला सर्वात जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्यासमोर हजर करील;

(ख) या संहितेमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अटक केलेल्या व्यक्तीला ज्याच्यासमोर हजर करण्यात आले असेल त्या न्याय दंडाधिकाऱ्याची, अशा व्यक्तीला चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी तात्पुरत्या स्थानबद्धतेत ठेवण्याकरिता वाजवी कारणे आहेत अशी खात्री पटली असेल त्या बाबतीत, तो, अशा व्यक्तीला, वेळोवेळी, आदेशाद्वारे, त्याला योग्य वाटेल अशा अभिरक्षेत पाठवू शकेलः

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, या कलमान्वये एका वेळी, पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी, आणि अशा व्यक्तीच्या अटकेच्या तारखेपासून एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक होईल इतक्या कालावधीसाठी, स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

(ग) जेव्हा एखाद्या व्यक्तीला, खंड (ख) अन्वये अभिरक्षेत पाठविण्यात येते त्या बाबतीत, दंडाधिकारी, शक्य तितक्या लवकर, ज्या कारणावरून आदेश काढण्यात आला आहे ती कारणे त्याला कळवील आणि अशा व्यक्तीला, त्या आदेशाविरुद्ध, सत्र न्यायालयाकडे अभिवेदन करता येईल. सत्र न्यायाधीश, असे अभिवेदन प्राप्त झाल्यावर, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एकतर, ते अभिवेदन फेटाळू शकेल किंवा अटक केलेल्या व्यक्तीला आणखी स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक नाही असे त्याला वाटले तर किंवा अन्यथा तसे करणे योग्य व न्याय्य वाटले तर, तो आदेश विलोपित करू शकेल आणि त्यानंतर, अटक केलेल्या व्यक्तीला तात्काळ मुक्त करण्यात येईल.".

**७.** उक्त संहितेच्या कलम १७३ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (एक) मधील, "चौदा दिवसांच्या" या मजकुराऐवजी, "सहा आठवड्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १७३ ची सुधारणा.

**८.** उक्त संहितेच्या कलम ४८२ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः— सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ४८२ ची सुधारणा.

"(१क) अटकपूर्व जामीन मागणाऱ्या अर्जदाराची उपस्थिती, अर्जाच्या अंतिम सुनावणीच्या वेळी आणि न्यायालयाने अंतिम आदेश देते वेळी, सरकारी अभियोक्त्याने केलेल्या अर्जावरून, न्यायाच्या हितार्थ न्यायालयाला अशी उपस्थिती आवश्यक वाटत असेल तर, अनिवार्य असेल.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७.]**

**[भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**(विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई